<u>**नवी मुंबई महानगरपालिका**</u>

<u>**स्थायी समिती**</u>

स्थायी समितीच्या **दिनांक १५ फेब्रुवारी २०११** रोजी भरलेल्या सभेतील **मंजूर /नामंजूर** इ. ठरावाची माहिती संक्षिप्त आणि मसूदा स्वरुपात खालील प्रमाणे आहे:-

**विषय क्र.१**
**दि.१५फेब्रुवारी२०११**

सी.बी.डी. से-१ येथील पिपल्स् शाळेमागील रस्त्यालगत आर.सी.सी. गटर बांधण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दि.२५/०१/२०११ चे पत्र क्र.नमुंमपा/श.अ/१७४/२०११.

ठराव क्र.४०३.
**दि.१५फेब्रुवारी२०११**

"उपरोक्त विषयासंदर्भात अंदाजपत्रकिय रक्कम रु.१९,९०,२६१/- (५ टक्के आकस्मिक खर्चासह) इतकी असून सदर खर्चास तसेच नियमानुसार देय असलेल्या भाववाढीच्या रकमेस सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी."

**निर्णय:- मंजूर.**

**विषय क्र.२**
**दि.१५फेब्रुवारी२०११**

नमुंमपा पा/पु योजना टप्पा-२ अंतर्गत मोरबे धरण ते भोकरपाडा, भोकरपाडा ते एम.बी.आर. ते कळंबोली जंक्शन, कळंबोली जंक्शन ते से.२८ सीबीडी पंपहाऊस पर्यत विविध व्यासाच्या जलवाहिनीचे परिचालन व परिरक्षण करणेचा त्रैवार्षिक सर्व समावेशक कंत्राटास दुस-या वर्षासाठी मुदतवाढ देण्याच्या कंत्राटाबाबत, आयुक्तांचे दि.०४/०२/२०११ चे पत्र क्र.नमुंमपा/श.अ./३२७/२०११.

ठराव क्र.४०४.
**दि.१५फेब्रुवारी२०११**

"उपरोक्त विषयासंदर्भात दिनांक ०१/०३/२०११ ते दिनांक २९/०२/२०१२ या कालावधीसाठी मे. किशन कंन्स्ट्रन्शन कं. यांना दुसऱ्या वर्षासाठी मुदतवाढ देण्यास व त्या कंत्राटाची रक्कम रु.८५,५०,०००/- इतक्या खर्चाने करार करण्यास सुचविल्याप्रमाणे, संमती देण्यात यावी."

**निर्णय:- संमत.**

**विषय क्र.०३**
**दि.१५फेब्रुवारी२०११**

ठाणे-बेलापूर रस्त्यावरील दिवाबत्तीची वार्षिक देखभाल व दुरुस्ती करण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दि.०५/०२/२०११ चे पत्र क्र.नमुंमपा/का.अ.(वि.)/२२२/२०११.

ठराव क्र.४०५.
**दि.१५फेब्रुवारी२०११**

"उपरोक्त विषयासंदर्भात रक्कम रु.२३,८६,५४९/- इतक्या खर्चास सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी."

**निर्णय:- मंजूर.**

**विषय क्र.०४** सन २०११- २०१२ या वर्षाकरीता मालमत्ता कराचे दर ठरविण्याच्या प्रस्तावाबाबत,
**दि.१५फेब्रुवारी२०११** आयुक्तांचे दि.०७/०२/२०११ चे पत्र क्र.नमुंमपा/कनिंस/३३०/२०११.

ठराव क्र.४०६.

**दि.१५फेब्रुवारी२०११**

``महानगरपालिकेला अशी शिफारस करण्यात यावी की, नवी मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीतील निवासी, अनिवासी व औद्योगिक मालमत्ता संबंधात सन २०११-२०१२ या शासकीय वर्षाकरीता खालील तक्त्यामध्ये तपशीलवार दिलेल्या दराने मालमत्ता कर, वृक्षकर, इत्यादी आकारण्यास, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ९९ अन्वये, सुचविल्याप्रमाणे मंजुरी देण्यात यावी :-

| अ.क्र | कराचा प्रकार | प्रस्तावित दर | | |
|---|---|---|---|---|
| | | निवासी | अनिवासी | औद्योगिक |
| १ | सामान्य कर (०.५% अग्निशमन करासहीत) | २३.५० % | ३२.५०% | ३२.५० % |
| २ | जल लाभ कर | १ % | ४% | ०.०० % |
| ३ | मलनि:स्सारण कर | ३ % | ७% | ०.०० % |
| ४ | मलनि:स्सारण लाभ कर | १ % | २% | ०.००% |
| ५ | महापालिका शिक्षण कर | १ % | ४% | ४.०० % |
| ६ | पथ कर | २.६७ % | ३.३३% | ८.०० % |
| ७ | वृक्ष कर | ०.५० % | ०.५०% | ०.५० % |
| | एकूण | ३२.६७% | ५३.३३% | ४५.००% |

**निर्णय:- मनपास शिफारस.**

**विषय क्र.०५** सार्वजनिक रुग्णालय वाशी येथे मॉरचूरी कॅबिनेट लावण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दि.०९/०२/२०११ चे पत्र क्र.नमुंमपा/का.अ.(वि.)/२२९/२०११.
**दि.१५फेब्रुवारी२०११**

ठराव क्र.४०७. "उपरोक्त विषयासंदर्भात रु. २४,८२,०६८/- इतक्या रकमेस सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी."
**दि.१५फेब्रुवारी२०११**

**निर्णयः- मंजूर.**

**विषय क्र.०६** नेरुळ से-४४ अे येथील धारा कॉम्प्लेक्स ते से-३६ करावे येथे जाणाऱ्या पदपथाची दुरुस्ती व सुधारणा करण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दि.१०/०२/२०११ चे पत्र क्र.नमुंमपा/श.अ./३४०/२०११.
**दि.१५फेब्रुवारी२०११**

ठराव क्र.४०८. "उपरोक्त विषयासंदर्भात अंदाजपत्रकिय रक्कम रु.१९,७७,८९८/- (५ टक्के आकस्मिक खर्चासह) इतकी असून सदर खर्चास तसेच नियमानुसार देय असलेल्या भाववाढीच्या रकमेस सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी."
**दि.१५फेब्रुवारी२०११**

**निर्णयः- मंजूर.**

**विषय क्र.०७** माता बाल रुग्णालय, कोपरखैरणे विभागाच्या सन १९९५-९६,१९९७-९८,१९९८-९९,२००३-०४ ,२००४-०५ आणि २००५-०६ या कालावधीतील लेखा परिक्षण अनुपालन अहवालाबाबत, आयुक्तांचे दिनांक १३/०४/२००९ चे पत्र क्र.नमुंमपा/आरोग्य/१६४९/२००९.
**दि.१५फेब्रुवारी२०११**

ठराव क्र.४०९. ``माता बाल रुग्णालय, कोपरखैरणे विभागाच्या लेखा परिक्षण अनुपालन अहवालापैकी सन १९९५-१९९६ या वर्षातील आक्षेप क्र.६, तसेच १९९७-१९९८ या वर्षातील आक्षेप क्र.८,९,१० व ११, तसेच १९९८-१९९९ या वर्षातील आक्षेप क्र.१ चा (२ व ८), तसेच सन २००३-२००४ या वर्षातील आक्षेप क्र.३,४,५,६ व १०, तसेच सन २००४-२००५ या वर्षातील आक्षेप क्र.२,६ व ७, तसेच २००५-२००६ या वर्षातील आक्षेप क्र.१,३, व ६ चा(२ व ३) हे आक्षेप कायम ठेऊन आयुक्तांचा प्रस्ताव मंजूर करण्यांत यावा "
**दि.१५फेब्रुवारी२०११**

**निर्णयः- मंजूर.**

**विषय क्र.०८** सन २०११-२०१२ या आर्थिक वर्षाकरिता उपकराचे दर ठरविण्याच्या प्रस्तावाबाबत,
**दि.१५फेब्रुवारी२०११** आयुक्तांचे दि.१४/०२/२०११ चे पत्र क्र.नमुंमपा/उपकर/आस्था-१/५८९/२०११.

ठराव क्र.४१०.
**दि.१५फेब्रुवारी२०११**

"महानगरपालिकेला अशी शिफारस करण्यात यावी की, सन २०११-२०१२ या कालावधीमध्ये नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रामध्ये उपयोग, उपभोग किंवा विक्रीसाठी आयात होणाऱ्या, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाच्या अनुसूची "अ" मधील सन २०११-२०१२ करीता म्हणजेच खालील तक्त्यामध्ये तपशीलवार दिलेल्या दराने उपकर वसूल करण्यास, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ९९ अन्वये, सुचविल्याप्रमाणे, मंजुरी देण्यात यावी :-

| अ.क्र | अनुसूची "अ"मधील बाब क्र. | तपशील | सन २०१०-२०११-करिता असलेले दर (टक्केवारी) | सन २०११-२०१२ या आर्थिक वर्षाकरिता प्रस्तावित दर (टक्केवारी) |
|---|---|---|---|---|
| १ | १, २, ४, ५, ६,८,९, १०, ४९(ब),९४(ब) | कृषी उत्पादने | ०.२०% | ०.२०% |
| २ | ३ | मद्य आणि स्पिरिटे व बिअर | २.००% | ४.००% |
| ३ | अनुसूची "अ" मधील बाब क्र. ७,१६,१७,१८,२१ ते ४२,४४ ते ४९(अ), ५० ते ६६,९४ (अ) मधील सर्व बाबी | अनुसूची `अ` मधील तपशीलानुसार. | १.००% | १.००% |
| ४ | ४३ व ९४(क) | अनुसूची `अ` मधील तपशीलानुसार. | १.००% | २.००% |
| ५ | ११ ते १५, १९, २०, ६७ ते ९३ | अनुसूची `अ` मधील तपशीलानुसार. | ०.००% | ०.००% |
| ६ | ८ | खाण्याचे बेकन व हॅम्स, टेबलबटर,टेबलबटरखेरीज अन्य लोणी, मार्गारीन, डबाबंद मासे, चीज, मिठाई, जॅम व जेली संघनित व टीकवून ठेवलेले दुध, आइस्क्रिम, सर्व प्रकारचे पिष्टमय अन्न, लोणची, कोको, कोकोच्या बिया व चॉकलेट, बिस्किटे व केक, डुकराची चरबी किंवा खाण्यास योग्य अशी जनावरांची चरबी, खवा, दुधाची मलई, चक्का, फळांचे रस, पाक व सर्व पेये, ग्लुकोज, डेक्सस्ट्रोज किंवा | १.००% | १.००% |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | कोणतीही फलशर्करा, टिकवून ठेवलेली अन्नसामग्री, बेकिंग पावडर किंवा कढीचा मसाला, सॅकरीन, सर्व प्रकारचे खाण्याचे रंग व अर्क, इतर सर्व प्रकारचे ग्लुकोज, माल्ट एक्स्ट्रॅक्ट, मध, पापड, बटाटावेफर्स, ताजे किंवा कोणत्याही उपयोगासाठी टिकवून ठेवलेले मांस आणि सकस दुध किंवा बनीव दुध किंवा मलईरहित दुधाची भुकटी खेरीज करुन विनिर्दष्टपणे तरतुद करण्यात न आलेले सर्व प्रकारचे अन्न किंवा पेये. | | |

"२. महापालिकेला अशीही शिफारस करण्यात यावी की, महापालिका हद्दीत कामे करणाऱ्या बांधकाम व्यावसायिक आणि कंत्राटदार यांना बांधकाम भोगवटा प्रमाणपत्र घेतेवेळी घेतेवेळी प्रती चौरस मीटर साठी सन २०१०-११ या आर्थिक वर्षाकरिता लागू असलेले दर म्हणजेच प्रती चौरस मीटर साठी खालील तक्यात तपशीलवार नमूद केल्याप्रमाणे सन २०११-२०१२ करिता उपकर आकारण्यास, उपरोक्त अधिनियमाच्या कलम ९९ अन्वये, सुचविल्याप्रमाणे, मंजुरी देण्यात यावी :-

| साधारण बांधकामाकरिता प्रति चौ.मि. | उद्वाहनाच्या सोयीने युक्त असलेल्या इमारती प्रति चौ.मि. | भव्य, किंमती आणि उच्च दर्जाच्या सोयी, सुविधने युक्त वाणिज्य व रहिवाशी उत्तुंग इमारती प्रति चौ.मि. **(High Rise Building)** |
|---|---|---|
| रु.३०.०० | रु.५०.०० | रु.८०.०० |

**निर्णय:- मनपास शिफारस.**

**विषय क्र.०९**
**दि.१५फेब्रुवारी२०११**

आयुक्तांचे दिनांक ११ फेब्रुवारी २०११ चे पत्र क्र.नमुंमपा/लेखा/६९/२०११:-

``नवी मुंबई महानगरपालिकेचे सन २०१०-२०११ चे सुधारीत आणि सन २०११-२०१२ चा मुळ अर्थसंकल्प `अ` आणि `क` च्या उत्पन्नाचे आणि खर्चाचे अंदाज मा. स्थायी समितीच्या येत्या सभेपुढे सादर करण्यात येत आहे.``

**ठराव क्र.४११**
**निर्णय:- विशेष सभेपर्यंत तहकूब.**